CMYK

दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । शनिवार
४.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २६८
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 




# वाल्मिक अण्णा को दिखाना था, हम कितने डेंजर है, त्यामुळे संतोष देशमुखांचा खून केला; सुरेश धसांचा दावा

**बीड, (प्रतिनिधी):-संतोष देशमुख हत्या प्रकरणात रोज मोठे खुलासे होत आहे. या प्रकरणी आता भाजप आमदार सुरेश धस यांनी मोठा दावा केला आहे. वाल्मिक अण्णा को दिखाना है.. हम कितने डेंजर है यासाठी हा खून झाला आहे, असा खळबळजनक दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. तसेच दोन महिन्यांपूर्वीच २ कोटींमधले ५० लाख दिले होते, असे देखील सुरेश धस म्हणाले.**

सुरेश धस म्हणाले, सुदर्शन घुले हा वाल्मिक कराड यांचा अत्यंत जवळचा कार्यकर्ता आहे. दोन कोटी रुपयांमधील ५० लाख दोन महिन्यापूर्वीच दिले आहेत. खंडणीचे दीड कोटी द्यायचे बाकी होते. आकांचं आणि आरोपींचं बोलणं झालंच असेल. सीडीआर काढून कोण कुणाला काय बोलले..ते कळेल पण आता आका वाचणार नाही. आकांच्या आदेशावर ही लोकं शुक्रवारी गेले होते. सुरेश धस म्हणाले, परळीतील राखेसंदर्भात मी आज पत्र देणार आहे. कारण पर्यावरण खाते सुद्धा आमच्या जिल्ह्यात आहे. सगळ्यात जिल्ह्यातील सर्वात जास्त प्रदूषण परळी तालुक्यातील आहे . दीडशे लोक हे माजी पालकमंत्री यांच्या घरातील लोक आहेत. ते राखेची वाहतूक करत असतात. तत्कालीन पालकमंत्र्यांनी पावर या अकाला दिली होती. त्यांनीच जिल्ह्यातील बरेच अधिकारी आणले आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील तपास पथकातील काही लोकांची बदली ही वाल्मिक कराड यांनी केली होती. म्हणून आम्ही त्यांची नावे घेतली आहेत. एसआयटीवर आमचा आक्षेप नाही यातील क्लास थ्रीमधील काही कर्मचाऱ्यावर आमचा आक्षेप आहे. करुणा मुंडेच्या गाडीमध्ये पिस्तूल ठेवणारा हा सुद्धा पोलीस दलातील व्यक्ती होता तो मला माहीत आहे, असेही धस म्हणाले.

### बीडच्या जेलमध्ये आरोपींना ठेवू नका

सुरेश धस म्हणाले,बीड प्रकरणमध्ये प्रकरण चालवावे. परंतु बीडच्या लॉकअपमध्ये हे लोक ठेवू नये. त्यांना संभाजीनगरच्या किंवा नाशिकच्या जेलला हलवण्यात यावे. कारण या आरोपींना भेटायला आणि सुविधा द्यायला अनेक आहे. मी आधीपण सांगितले आहे की, बीडमध्ये बिंदूनामावलची वास्तूशांती झाली आहे. बीडचे वाटोळे झाले आहे. बीडमध्ये काहीही घडू शकते. आता तर मी आरोपींना हलवा असे म्हणतो भविष्यात ही केस दुसऱ्या जिल्ह्यात हलवण्याची वेळ येईल.



बीड सरपंच हत्या प्रकरण

## लोकवर्गणीतून ४४,१३,४८८ रुपयांची देशमुख कुटुंबाला मदत



माजलगाव, (प्रतिनिधी):-बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. या हत्येच्या घटनेला आता जवळपास २५ दिवसांचा कालावधी लोटला आहे. तरीही या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहे. त्यांचा शोध सुरु आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड याला अटक करण्यात आली आहे. त्याला १४ दिवसांची सीआयडी कोठडी बजावण्यात आली आहे. या प्रकरणी सीआयडीचा विविध पथकांच्या माध्यमातून तपास सुरु आहे. ही घटना प्रचंड भयंकर आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्य हादरलं आहे. संतोष देशमुख यांचे अत्यंत हाल करुन त्यांना संपवलं आहे. त्यामुळे या घटनेविरोधात नागरिकांमध्ये रोष आहे. या घटनेनंतर नागरिकांकडून लोकवर्गणी काढून देशमुख यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत केली जात आहे. माजलगावचे राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. ''माजलगाव मतदारसंघाच्या वतीने मृतक संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना एक मदत म्हणून ४४ लाख १३ हजार ४८८ रुपये जमा करून दिले आहेत. अजून तीन ते चार दिवसांमध्ये लोक निधी गोळा करत आहेत. ते झाले की आम्ही आणून देणार ▶▶पान २ वर

## धनंजय मुंडे, पंकजा मुंडेंचा पत्ता कट?



### अजित पवार बीडचे पालकमंत्री होण्याची शक्यता

बीड, (प्रतिनिधी):- बीडच्या संतोष देशमुख हत्याकांडामुळे अवघ्या महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. या घटनेमुळे बीड जिल्ह्यातील कथित गुन्हेगारीचा मुद्दा चव्हाट्यावर आला आहे. ही गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी सर्वपक्षीय आमदारांनी बीडचे पालकत्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घ्यावे अशी मागणी केली आहे. त्यावर अजित पवारांनी यासंबंधी सकारात्मकता दर्शवल्याची माहिती आहे. यामुळे या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे व त्यांच्या भगिनी पंकजा मुंडे यांचा पत्ता कट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू वाल्मीक कराड यांचे नाव आले आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांना चौफेर टीकेचा सामना करावा लागत आहे. विशेषतः बीडमधील सर्वपक्षीय आमदारांनी या प्रकरणी त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरल्यामुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्रीपद स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याची चर्चा राजकीय ▶▶पान २ वर

## अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे ॲक्शन मोडवर

### डिसेंबर महिन्यात धान्यापासून वंचित राहिलेल्या शिधापत्रिका धारकांच्या बाबत घेतला आढावा



परळी वैद्यनाथ, (प्रतिनिधी):- डिसेंबर महिन्यातील धान्य वितरणाच्या अनुषंगाने राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे आज ॲक्शन मोडवर आले आहेत. डिसेंबर महिन्यात राज्यात प्राप्त नियतनाच्या एकूण ९२.०९% धान्याचे वितरण झाले असून, उर्वरित वितरणामध्ये आलेल्या अडचणींच्या अनुषंगाने आज धनंजय मुंडे यांनी सबंध राज्याच्या पुरवठा विभागाची व्हीसीद्वारे बैठक घेतली.ड्ड्ड्ई - पॉस मशीन वरील अडचणी, पोर्टलचे सर्वर डाऊन, यांसह विविध अडचणींची तसेच धान्य वितरणाची ▶▶पान २ वर

## विष्णू चाटेच्या फोनवरून वाल्मिकने मागितली २ कोटीची खंडणी

### अखेर मावस भावानेच तोंड उघडलं

बीड, (प्रतिनिधी) :- राज्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाने संपूर्ण राज्यात मोठा गदारोळ झाला. पवनचक्की खंडणी प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. आरोपी विष्णू चाटे याने वाल्मीक कराडने खंडणीसाठी पवनऊर्जा कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधल्याची कबुली दिली आहे. संतोष देशमुख यांचे अपहरण व हत्या प्रकरणासह पवनऊर्जा कंपनीकडून तब्बल २ कोटींची खंडणी उकळण्याच्या प्रकरणात विष्णू चाटे सध्या पोलिसांच्या कोठडीत आहे. तिथे त्याची कसून चौकशी सुरू आहे. या चौकशीत त्याने वाल्मीक कराडने आपल्या फोनवरून पवनऊर्जा कंपनीच्या अधिकाऱ्यांशी खंडणी संदर्भात बोलणी केल्याची कबुली दिली आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) कोर्टात सादर केलेल्या प्राथमिक अहवालाद्वारे हा खुलासा झाला आहे.



### काय कबुली दिली?

वाल्मिक कराडने पवन चक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांशी फोनवर संभाषण केले होते. वाल्मिक कराडने आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दोन कोटींची खंडणी मागितली होती. यासंदर्भात कंपनीच्या अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल केला होता. विष्णू चाटे याने स्वत: वाल्मिक कराड यांना फोन लावून पवन चक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांशी बोलणे करुन दिल्याची कबुली दिली आहे. च्या रिमांड कॉपीमध्ये तसा उल्लेख आहे.

## महाअद ए मिल्लत कडून दिनियात परीक्षा संपन्न



बीड, (प्रतिनिधी):-मानवी जीवनाला नैतिकतेची जोड असली पाहिजे व्यावहारिक आणि वैज्ञानिक शिक्षण घेत असताना आम्हाला नैतिक ज्ञान देखील असावे या उदात्त हेतूने मालेगाव येथील महाअद ए मिल्लत कडून दिनियात परीक्षा घेण्यात आली ज्या मध्ये बीड शहरातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बीड शहरातील विभिन्न ▶▶पान २ वर




## गृहराज्यमंत्र्यांचा सर्वात मोठा दावा, शरद पवार महायुतीत सामील होणार?



मुंबई, (वृत्तसेवा):-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सत्ताधारी आणि विरोधी या दोन्ही गटांचं आगामी काळात मनोमिलन होणार का? ते पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे. कारण राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्याबाबत सकारात्मक प्रतिक्रिया देण्यात येत आहे. त्यामुळे शरद पवार आणि अजित पवार हे पुन्हा एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. असं असलं तरी तसं झालं तर मग उपमुख्यमंत्री अजित पवार हे सत्ता सोडून शरद पवारांकडे जाणार की शरद पवार हे विरोधातील महाविकास आघाडी सोडून सत्तेत सहभागी होणार? हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. विशेष म्हणजे शिवसेनेचे नेते तथा राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. ''कदाचित राष्ट्रवादी शरद पवार गट महायुतीत सामील होऊ शकतो. याबाबत अजित पवार आणि शरद पवार यांच्यामध्ये अनेक बैठका झालेल्या आहेत'', असं मोठं भाकीत राज्यमंत्री योगेश कदम यांनी वर्तवलं आहे. ''महाविकास आघाडीचे अनेक पराभूत उमेदवार महायुतीच्या वाटेवर आहेत. महाविकास आघाडीचा प्रत्येक पराभूत आमदार महायुतीसोबत जोडण्याचा प्रयत्न करत आहे'', असाही मोठा दावा त्यांनी केला. तसेच ''महायुतीची सत्ता ही कायम राहणार आहे'', असा विश्वास योगेश कदम यांनी व्यक्त केला आहे.



# खरोखरच खतरे में



स्वत:चे चालते पाय स्वत:च्या हाताने कुऱ्हाड मारून कसे जायबंदी करावेत याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिकेत न्यूऑर्लिन्स येथे नववर्षदिनी झालेला दहशतवादी हल्ला. त्यात ११ जणांचा हकनाक बळी गेला. त्यातील आरोपी 'आयसिस' या इस्लामी अतिरेकी संघटनेशी संबंधित असल्याचे प्राथमिक चौकशीतून दिसून येते. त्याआधी जर्मनीतील ख्रिसमस बाजारपेठेतील हल्ल्यात पाच जण ठार झाले. दोन्हीही हल्ल्यांतील मारेकऱ्यांची पद्धत एकच. गर्दीच्या स्थळी सुसाट वेगात वाहन घुसवायचे आणि जमेल तितक्यांस त्याखाली चिरडायचे. ना शस्त्राची गरज ना अस्त्राची. हे हल्ले अमेरिका आणि जर्मनी या देशांत का झाले, यांस तर्कशुद्ध उत्तर नाही. उद्या अन्य कोणत्या देशात तसे हल्ले होतील याचा अंदाज तर्काच्या आधारे बांधता येणार नाही. अमेरिकी सरकारने अलीकडे काही इस्लामचे वाकडे केले होते आणि जर्मनीने इस्लामच्या विरोधात काही पावले उचलली होती, असेही नाही. उलट हे दोन देश इस्लाम आणि इस्लामी याविषयी तूर्त अधिक सहिष्णू आहेत. अमेरिकेत डेमॉक्रेटिक पक्षाची सत्ता आहे आणि जर्मनीत सहिष्णू असे 'सोशल डेमॉक्रेट्स' सत्तेवर आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन हे इस्लामीविरोधी नाहीत आणि जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शॉल्झ यांच्याही मनात इस्लामविषयी शत्रुत्व नाही. तरीही या दोन देशांतील अश्राप नागरिकांस इस्लामी दहशतवाद्यांनी विनाकारण लक्ष्य केले. या दोन देशांतील राजकीय परिस्थिती लवकरच बदलेल. बायडेन यांच्या जागी सरळ सरळ इस्लामविरोधी डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येतील आणि जर्मनीतही होऊ घातलेल्या निवडणुकांत कडव्या उजव्यांस संधी मिळेल. म्हणजे आगामी काळ इस्लामींसाठी अनुक्रमे अमेरिका आणि जर्मनी आणि त्यामुळे युरोपात खडतर असेल. अशा वेळी आगामी काळात आपणास सहानुभूती मिळेल असे वागायचे की आपल्याविषयीचा संताप आणखी वाढेल अशी कृत्ये करायची? याचे भान इस्लाम धर्मीय मुखंडांना नाही आणि हीच खरी इस्लामींची समस्या आहे. युरोपातील ऑस्ट्रियापासून ते अटलांटिकपलीकडील अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशा अनेक देशांत इस्लाम धर्मीयांबाबत संशयाचे वातावरण तयार होऊ लागले असून त्यास फक्त आणि फक्त इस्लाम धर्मीयच जबाबदार आहेत. आताही अमेरिकेत वा जर्मनीत झाले त्याचा निषेध करण्यास इस्लामी देश पुढे आल्याचे दिसत नाही; ते का? सध्या पश्चिम आशियातील एकाही देशात शांतता नाही. इजिप्त, सीरिया, लेबनॉन, येमेन, इराक, इराण इत्यादी अनेक दाखले देता येतील. यातील पॅलेस्टाइन आणि इस्रायल हा नापाक संघर्ष सोडल्यास अन्यत्रच्या अशांततेसाठी पाश्चात्त्य देशांस बोल लावता येणार नाही. सीरिया, येमेन, इराण आदी देशांतील राज्यकर्तेच नादान निघाले. कोणी जनतेच्या जिवावर अय्याशी करत राहिला तर अन्य कोणी धर्माच्या नावे आपल्याच देशांतील महिलांची मुस्कटदाबी करत राहिला. या इस्लामी– त्यातही तेलसंपन्न– देशांची लूट एके काळची महासत्ता इंग्लंड, नंतर अमेरिका या देशांनी केली हे खरे. ओसामा बिन लादेन वा इस्लामी धर्मवादाची काडी पेटवणारी 'मुस्लीम ब्रदरहूड' असो. ही सर्व अमेरिकी अर्थकारणातून आकारास आलेली पिलावळ हेही खरे. तथापि ते अर्थकारण संपले. सौदी अरेबिया, इराण यांसारख्या इस्लामी सत्तांनी आपापले अर्थकारण स्वत: राखण्यास सुरुवात केली. अशा वेळी त्याच अर्थकारणाचा जास्तीत जास्त लाभ कसा घेता येईल असे प्रयत्न करण्याऐवजी इस्लामी जगतातील एक घटक दहशतवादाचा अवलंब करताना दिसतो. हे मूर्खपणाचे आहे. 'आयसिस'ने अमेरिकेत कितीही हाहाकार घडवून आणला तरी त्या देशाचे काहीही दीर्घकालीन नुकसान होणारे नाही. याआधी 'अल कईदा'ने '९/११' घडवले. त्याहीआधी त्याच वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारती स्फोटकेधारी मालमोटारी आदळवून पाडण्याचा प्रयत्न युसुफ रामझी याने १९९३ साली केला. काय वाकडे झाले अमेरिकेचे? पाकिस्तानने भारतात २६/११ घडवून आणले. आज त्या देशाची अवस्था काय? आपली एक 'टीसीएस' कंपनी समग्र कराची स्टॉक एक्स्चेंजला खिशात टाकेल, ही त्या देशाची अवस्था. ती इस्लामी धर्ममार्तंडांस दिसत नाही काय? दिसत असेल तर आता तरी जरा शहाण्यासारखे वागावे असे त्यांस वाटत नाही काय? या अशा दहशतवादी हल्ल्यांतून काय हाती लागणार? मुळात हे दहशतवादी काय मिळवू पाहतात? सद्या:स्थितीत इस्लामी जगाचा संताप एका कारणासाठी वैध असू शकतो. ते म्हणजे इस्रायलने पॅलेस्टिनी भूमीत चालवलेले वांशिक शिरकाण. इस्रायलला रोखण्याची ताकद फक्त अमेरिकेत आहे आणि अमेरिका त्यासाठी पुरेशी प्रयत्न करताना दिसत नाही, हे मान्य. या मुद्द्यावर अमेरिकेचे मावळते अध्यक्ष जो बायडेन अगदीच नेभळट निघाले, हेही मान्य. पण म्हणून अमेरिकेतील निरपराधांची हत्या कशी क्षम्य ठरते? 'आयसिस' वा अन्य कोणा दहशतवादी संघटनेस इतकीच खुमखुमी असेल तर त्यांनी आपले जे काही आहे ते शौर्य पॅलेस्टिनी भूमी रक्षणार्थ दाखवावे. अमेरिकेत नववर्षाचा आनंद साजरा करू पाहणाऱ्यांवर गाड्या चालवण्यात कसला आला आहे धर्म? परत त्यातही यांची लबाडी अशी की हे इस्लामवादी पाश्चात्त्य जगातील भौतिक सुख–सोयींचा लाभ घेणार. तेथील सहिष्णू सामाजिकतेचा फायदा घेत स्वत:ची भौतिक प्रगती साधणार. आणि परत त्याच सहिष्णुतेने दिलेल्या सोयीसवलती दहशतवादासाठी वापरून स्थानिकांच्याच जिवावर उठणार, हे कसे आणि किती काळ सहन होईल? जगभरातील अनेक देशांत सध्या राष्ट्रवादी ताकदींचे पुनरुत्थान मोठ्या प्रमाणावर होत असताना आपली कर्मभूमी ही मातृभूमी न मानणाऱ्या इस्लामी कट्टरपंथीयांसाठी आगामी काळ अधिकाधिक खडतर होत जाणार हे समजून न घेणे बिनडोकपणाचे आहे. या कट्टरपंथीयांच्या या बिनडोकपणाकडे एक वेळ दुर्लक्ष करता येईल. पण मग अन्य नेमस्त इस्लामींचे काय? त्यांनी पुढे येऊन या स्वधर्मीय अतिरेक्यांविरोधात भूमिका घ्यायला नको? अन्य कोणाचे ऐकतील न ऐकतील. पण इस्लामी कट्टरपंथीयांस स्वधर्मीय बांधवांकडे दुर्लक्ष करणे अवघड जाईल. कारण आधीच अन्य धर्मीयांमध्ये इस्लामच्या विरोधकांत वाढ होत असताना स्वपक्षीयांनीही पाठ फिरवली तर मग धर्म राहील कोणासाठी हा प्रश्न. आधीच जगात सध्या द्वेषाचे प्याले ओसंडून वाहत आहेत. अशा वेळी ही द्वेषभावना कमी करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. ते राहिले बाजूला. या इस्लामी कट्टरपंथीयांस या वास्तवाची जाणीवच नाही. अमेरिकेतील ताजा हल्ला करणाऱ्या 'आयसिस'चे कार्यक्षेत्र लिबिया, इराकचा काही भाग, सीरिया आणि 'लेवान्त' नावाने ओळखला जाणारा पश्चिम आशियातील प्रदेश. हे 'आयसिस'चे वेडेपीर उलट या अशांमुळे शांततापूर्ण मार्गाने जगणाऱ्या अन्य इस्लामींचे आयुष्य अधिक खडतर होईल. आधीच ''सर्व इस्लामी दहशतवादी नसतात; पण सर्व दहशतवादी इस्लामी असतात'' अशी सुभाषिते फेकणाऱ्या मूर्खशिरोमणींची सध्या अनेक ठिकाणी चलती आहे. त्यांच्या संख्येत अशा दहशतवादी हल्ल्यांनी वाढच होईल. या इस्लामींच्या राजकीय मागण्या असतील तर त्यांनी त्या राजकीय मार्गांनी धसास लावाव्यात. हिंसा कोणत्याही धर्माने केली तरी ती निषेधार्हच असते. 'लोकसत्ता' ही भूमिका सातत्याने मांडत असून दहा वर्षांपूर्वी 'इस्लाम खतरे में है' या संपादकीयातूनही (७ डिसेंबर २०१५) ती व्यक्त करण्यात आली होती. तिचा पुनरुच्चार करण्याची गरज आणि वेळ आली आहे. कारण या अशा अतिरेक्यांमुळे इस्लाम आता खरोखरच खतरे में आहे.

# धनंजय देशमुखांच्या आरोपावर 'त्या' माजी सरपंचाचं स्पष्टीकरण

## म्हणाले, ''मी वाल्मिक कराडला भेटायला गेलो नव्हतो

बीड, (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी निर्घृणपणे हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली. या घटनेतील काही आरोपींना पोलिसांनी अटक केलं, तर काही आरोपी अद्यापही फरार आहेत. फरार आरोपींचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. दुसरीकडे पवनचक्की प्रकरणात दोन कोटींच्या खंडणी प्रकरणात वाल्मिक कराड सीआयडीला शरण आला असून तो सध्या पोलीस कोठडीत आहे. मात्र, वाल्मिक कराडला विविध सुविधा देण्यात येत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. यातच मयत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी माजी सरपंच बालाजी तांदळे यांनी वाल्मिक कराडची भेट घेतल्याचा आरोप करत पोलीस ठाण्यात आपल्यालाही अरेरावी केल्याचा आरोप केला होता. तसेच धनंजय देशमुख यांनी यासंदर्भात बीडच्या पोलीस अधीक्षकांनाही पत्र लिहिलं होतं. यामध्ये कोठडीत असलेल्या वाल्मिक कराडला मिळणाऱ्या सुविधा आणि यंत्रणेचा गैरवापर होत असल्याचा आरोप केला होता. तसेच वाल्मिक कराड कोठडीत असताना त्याची भेट घेणारा माजी सरपंच कोण?




असा सवाल धनंजय देशमुखांनी विचारला होता. या आरोपानंतर आज बालाजी तांदळे यांनी स्पष्टीकरण देत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. तसेच माझी आणि वाल्मिक कराडची भेट झाली नसून सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी आपल्याला चौकशीसाठी बोलावलं होतं. त्यामुळे धनंजय देशमुखांनी केलेले आरोप खोटे असल्याचं बालाजी तांदळे यांनी वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटलं आहे. धनंजय देशमुखांनी केलेल्या आरोपासंदर्भात बोलताना बालाजी तांदळे यांनी म्हटलं की, ''मी वाल्मिक कराडला भेटायला गेलो हे चुकीचं आहे. कारण वाल्मीक कराडला भेटायला मी गेलो नव्हतो, तर मला तपासाकामी सीआयडीने बोलावलं होतं. सीआयडीने मला एका रुममध्ये बसवून काही प्रश्न विचारले. मी वाल्मिक कराडला भेटायला गेलो नव्हतो आणि माझी त्यांच्याशी भेटही झाली नाही. मला सीआयडीच्या कार्यालयामधून फोन आला होता. त्यानंतर मला सांगितलं की केजमध्ये या. पुन्हा मला सांगितलं की बीडमध्ये या. मग मी बीड सीआयडीच्या कार्यालयात आलो असता तीन तास चौकशी झाली. पण मध्ये मी बाथरूमला गेल्यानंतर बाहेर येताना मला धनंजय देशमुख दिसले. तेव्हा मी सांगितलं की सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी बोलावलं होतं. मी कोणालाही भेटायला आलेलो नाही'', असं बालाजी तांदळे यांनी म्हटलं. ''सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहेत. त्या फरार आरोपींसंदर्भात काही माहिती आहे का? यासंदर्भाने मला सीआयडीने बोलावलं होतं. मात्र, मी जर वाल्मिक कराडला भेटण्यासाठी गेलो असेल तर त्या कोठडीतील सीसीटीव्ही तपासा म्हणजे मी खोट बोलत असेल तर सीसीटीव्हीत काय ते दिसेल'', असं बालाजी तांदळे यांनी म्हटलं आहे.

# धनंजय मुंडे यांच्यावर मोठं संकट, पक्षाच्याच आमदारांची अजित पवार यांच्याकडे राजीनाम्याची मागणी

मुंबई, (वृत्तसेवा):–मंत्री धनंजय मुंडे यांच्यामागचं शुक्लकाष्ट काही केल्या कमी होताना दिसत नाही. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांना सीआयडीने अटक केली आहे. या प्रकरणात विरोधकांकडून थेट धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला जातोय. भाजप आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत या प्रकरणाची इत्यंभूत माहिती दिली. तसेच आमदार जितेंद्र आव्हाड यांनीदेखील विधानसभेत रोखठोक भूमिका मांडली. यानंतर धनंजय मुंडे यांच्यावर अप्रत्यक्षपणे सातत्याने निशाणा साधण्यात आला. तसेच विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने केली जात आहे. विशेष म्हणजे आता त्यांच्या पक्षातील आमदारांकडूनही धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांच्यामागचं संकट काही कमी होताना दिसत नाही. ''मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्या'', असं मराठवाड्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी मागणी केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मराठवाड्यातील राष्ट्रवादीचे आमदार मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी आग्रही असल्याची माहिती मिळत आहे. धनंजय मुंडे यांची आरोपी वाल्मिक कराड याच्यासोबत असलेल्या जवळकीमुळे त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या मराठवाड्यातील आमदारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्या, अशी मागणी केल्याची सूत्रांची माहिती आहे. आगामी काळात मराठा समाजाच्या रोषाला सामोरं जावं लागू नये, त्याचबरोबर ही एकाधिकारशाही मोडीत काढावी, अशी मागणी मराठवाड्यातील राष्ट्रवादीच्या आमदारांनी अजित पवार यांच्याकडे केल्याची सूत्रांची माहिती आहे.

# चीनमध्ये कोरोनासारख्या नव्या व्हायरसचा हाहा:कार



## हॉस्पिटलमध्ये रुग्णांची गर्दी, स्मशानभूमीत मृतदेहांचा खच

मुंबई, (वृत्तसेवा) :– चीनच्या वुहान शहरातून पसरलेल्या कोरोना व्हायरसने संपूर्ण जगभरात थैमान घातलं होतं. कोविडमुळे जगभरातील अनेक लोकांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, आता कोरोनासारख्या आणखी एका व्हायरसने तोंड वर काढलंय. कोरोनानंतर पाच वर्षांनी चीनमध्ये नवा व्हायरस पसरलाय. चीनमध्ये सध्या ह्यूमन मेटान्यूमो व्हायरस हा व्हायरस वेगाने पसरतोय. संपूर्ण देशातील हॉस्पिटलमध्ये रुग्णांची गर्दी पाहायला मिळत आहे. शिवाय स्मशानभूमीमध्ये मृतदेहांचा खच पडलाय. चीनमधील या नव्या व्हायरसची सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे. मीडिया रिपोर्टनुसार, हा नवा व्हायरस चीनमध्ये वेगाने पसरतोय. देशातील रुग्णालयात स्मशानभूमीप्रमाणे मृतदेह दिसत आहेत, असा दावाही केला जातोय. अनेक लोकांना या व्हायरसची लागण होताना दिसत आहे. चीनमधील रुग्णालयात होत असलेल्या गर्दीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत, त्यामुळे संपूर्ण जगभरातून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. कोरोना आणि माइकोप्लाज्मा न्यूमोनिया यासारखे आजार देखील वेगाने पसरत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे चीनमधील यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या आहेत. एनडीटिव्हीच्या रिपोर्टनुसार, चीनमध्ये सध्या या नव्या व्हायरसमुळे हाहा:कार पाहायला मिळतोय. झाल्यानंतर ताप येतो, शिवाय याची लक्षणे कोरोना व्हायरस सारखीच आहेत. त्यामुळे चीनची आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. मात्र, अजूनपर्यंत ठोस उपाययोजना करण्यात चीनला यश आलेले नाही. आरोग्य विभागातील सर्व अधिकारी चीनमधील परिस्थितीचे निरीक्षण करत आहेत. कोरोनानंतर अवघ्या पाच वर्षांनी चीनमध्ये ने लोकांचं टेन्शन वाढलंय. या व्हायरसने चीनमधील नागरिक चिंतेत आहेत. हॉस्पिटलमध्ये रुग्णांची संख्या वाढत असल्याने आरोग्य विभागाकडूनही चिंता व्यक्त करण्यात येत आहे. लोकांनी सातत्याने मास्क वापरावा, सातत्याने हात धुवावेत, असा सल्ला आरोग्य विभागाकडून देण्यात आलाय.

### ह्यूमन मेटान्यूमो व्हायरस हा व्हायरसचं सत्य काय?

ह्यूमन मेटान्यूमो व्हायरस हा एक आरएनए व्हायरस आहे. याचा शोध सर्वात प्रथम २००१ मध्ये डच संशोधकांनी घेतला होता. श्वास घेण्यास त्रास होत असलेल्या बाल रुग्णांच्या सॅम्पलची चाचणी करत असताना या व्हायरसची माहिती समोर आली होती. दरम्यान, हा व्हायरस गेल्या ६ दशकांपासून अस्तित्वात असल्याचा दावा तत्कालीन संशोधकांनी केला होता. या व्हायरसची लागण झाल्यानंतर श्वास घेण्यास त्रास होतो. हा व्हायरस प्रामुख्याने खोकला आणि शिंक आल्यानंतर वेगाने पसरतो.

पान १ वरून

### लोकवर्गणीतून...

आहोत'', अशी माहिती प्रकाश सोळंके यांनी दिली. ''आरोपींना अजूनही अटक झालेली नाही हे दुर्दैवी आहे. तसेच पोलीस यंत्रणा आणि तपास करणाऱ्या यंत्रणालाचं हे अपयश आहे असं मी मानतो. उद्या मी मुंबईला जाऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कानावर देखील हा सगळा वृत्तांत घालणार आहे. दुर्दैवी आहे, बीड जिल्ह्यामधील पोलीस यंत्रणा संबंध उलटून गेलेली आहे'', असं प्रकाश सोळंके म्हणाले.

### धनंजय मुंडे, पंकजा मुंडे...

वर्तुळात रंगली आहे. बीडच्या पालकमंत्रीपदावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात चर्चा झाली आहे. या चर्चेत बीडचे पालकमंत्रीपद धनंजय मुंडे किंवा त्यांच्या भगिनी मंत्री पंकजा मुंडे यांना न देण्यावर मतैक्य झाल्याची माहिती आहे. विशेषत: बीडमध्ये घडणाऱ्या चुकीच्या गोष्टींवर अंकुश ठेवण्यासाठी स्वत: अजित पवार या जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारतील, असा दावा एका मराठी वृत्तवाहिनीने केला आहे. विशेष म्हणजे राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराला दोन आठवड्यांचा कालावधी लोटला आहे. पण अद्याप जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची घोषणा झाली नाही. सत्ताधारी महायुतीमधील घटकपक्षांमध्ये सध्या या प्रकरणी सल्लामसलत सुरू असल्यामुळे या प्रकरणी विलंब होत असल्याची माहिती आहे. दुसरीकडे, धनंजय मुंडे यांनी आपल्या राजीनाम्याची मागणी फेटाळून लावली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात माझा काहीही संबंध नाही. त्यामुळे मी राजीनामा का द्यावा? असा सवाल त्यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे. संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्यांविरोधातील खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा. त्यांना फाशीची शिक्षा दिली जावी अशी मागणी मी यापूर्वीच केली आहे. त्यामुळे कुणी काय बोलावे व कुणाचे काय होणार? अशा प्रश्नांना काहीही अर्थ नाही, असे ते म्हणालेत.

पान १ वरून

### विष्णू चाटेच्या...

* आरोपी विष्णू चाटे कोण आहे? : संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे हा केज तालुक्यातील कवडगावचे पूर्वी सरपंच होता. विष्णू चाटे हा अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या केज तालुकाच्या अध्यक्ष होता. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात त्याला सह आरोपी करण्यात आल्यानंतर त्याला पक्षातून निलंबित करण्यात आले. विष्णू चाटे हा देखील धनंजय मुंडे यांचा समर्थक असल्याचे बोलले जात आहे. वाल्मिक कराडसोबतही त्याचे निकटचे संबंध असल्याचे बोलले जात आहे. मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अमानुषपणे हत्या करण्यात आली. त्यानंतर १० व्या दिवशी पोलिसांना विष्णू चाटेला पकडण्यात यश आले होते.

### बच्चू कडू यांचा...

व्हावी अशी आमची इच्छा आहे, सरकार याबाबतचा निर्णय घेईल, असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. दरम्यान उद्धव ठाकरे यांचं सरकार असताना बच्चू कडू यांनी उद्धव ठाकरे सरकारला पाठिंबा दिला होता. बच्चू कडू यांना राज्यमंत्रिपद देखील देण्यात आलं होतं. मात्र त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतून उठाव केला. त्यामुळे ठाकरे सरकार कोसळलं, शिवसेनेच्या अनेक आमदारांनी यावेळी एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला. बच्चू कडू यांनी देखील एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला होता. मात्र नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांना मंत्रिपद भेटलं नाही तर त्यांची नियुक्ती ही दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान अध्यक्ष पदावर करण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीत देखील बच्चू कडू यांचा यावेळी पराभव झाला, त्यानंतर त्यांनी आता आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.

पान १ वरून

### महाअद ए मिल्लत...

शाळेतून तब्बल १८९५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थी अध्यात्मिक शिक्षण सामान्य करतील असा हेतू होता. विशेष करून गांधी नगर येथील मौलाना मुख्तार साहब यांच्या निगराणीत सदरील परीक्षा संपन्न झाल्या. मुफ्ती मुहीद्दीन रियाज सिद्दिकी यांनी सहभाग नोंदवला. मुफ्ती वसीम हाफिज हारून हाफिज नईम, मौलाना समीर, मौलाना नाजीम, मौलाना शफिक, मेयाज मीर, नर्गिस जावेद सय्यद, नसरीन मिस काजी जफर साहेब यांनी परीक्षेचे संचालन केले. यासाठी मिलीया गर्ल्स हायस्कूल, जिल्हा परिषद उर्दू स्कूल मोमिनपुरा, मिलीया वहतानिया उर्दू स्कूल भालदारपुरा नैष्णल प्रायमरी स्कूल हे परीक्षेचे केंद्र होते. यासाठी मुख्य अध्यापक इरफान सिद्दिकी रिजवाना बाजी रजीयोदि नसर मोमीन, आसमा बाजी व मुख्य अध्यापक रजीयोद्दिन इनामदार म काझी मुजीब यांचे आभार मौलाना मुखतार यांनी व्यक्त केले.

पान १ वरून

### अन्न व नागरी पुरवठा...

जिल्हा निहाय वस्तुनिष्ठ आकडेवारी धनंजय मुंडे यांनी त्या त्या जिल्ह्याच्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. ठाण्यात सर्वाधिक ९८.५९ तर धुळे जिल्ह्यात सर्वात कमी ८१.६९% इतके धान्य वितरण डिसेंबर महिन्यात झाले असून ही आकडेवारी शंभर टक्क्यांकडे घेऊन जाण्यासाठी ऑनलाईन व अन्य तांत्रिक अडचणी दूर करण्यासंदर्भात धनंजय मुंडे यांनी विभागाला निर्देश दिले असून या संदर्भात सर्व संबंधितांची पुढील आठवड्यात आणखी एक बैठक घेणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी विभागाला निर्देश दिले आहेत. ङ्गङ्गसर्वर डाऊन असणे, किंवा अन्य कारणांनी ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये विविध योजनेतील लाभार्थींना धान्य वितरण डिसेंबर महिन्यात होऊ शकले नाही त्यांना या महिन्यांमध्ये मुदतवाढ देण्याबाबतचे प्रस्ताव तातडीने देण्याबाबतही धनंजय मुंडे यांनी संबंधित जिल्ह्यांना निर्देश दिले आहेत. ङ्गङ्गभंडारा जिल्ह्यातील उर्वरित साखर उपलब्ध करून देणे त्याचबरोबर नागपूर विभागातील पुरवठा निरीक्षक व अन्य रिक्त पदे भरून देण्याबाबतचा प्रस्ताव देखील स्वतंत्ररीत्या मागवण्याबाबत धनंजय मुंडे यांनी संबंधितांना या बैठकीत निर्देश दिले आहेत. एफसीआय कडे विविध करार काही दिले व अन्य असलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने पुढील आठवड्यातील बैठकीमध्ये त्यावर निर्णय घेतला जाईल असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी सांगितले. ङ्गङ्गविविध जिल्ह्यांमध्ये ज्या ठिकाणी धान्याचे रॅक उतरवले जातात, त्या भागातील रस्ते व अन्य सुविधांच्याबाबतही स्वतंत्र आढावा घेऊन निर्णय घेण्यात येईल असेही धनंजय मुंडे म्हणाले आहेत. ई – पॉस मशीनवर डेटा उपलब्ध करून देणे, सर्वर डाऊन च्या समस्या यासह सर्वच्या सर्व तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्यासंदर्भात धनंजय मुंडे यांनी स्वतंत्र निर्देश दिले आहेत. ङ्गङ्गया बैठकीस अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सहसचिव, उपसचिव, शिधावाटप संचालनालयाचे नियंत्रक, पुरवठा विभागाचे सर्व उपयुक्त तसेच राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी व उपनियंत्रक आदी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०१९-२० साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अतंर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे / योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे २०१९-२० करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम, २०१७ नुसार जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत खेळाडू ( ०१ पुरूष ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू ) व ०१ गुणवंत क्रीडा कार्यकर्ता असे एकुण ०५ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सन २०१९-२० च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दिनांक ०१ जुलै २०१८ ते ३० जून २०१९ या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

गुणवंत खेळाडू- १.खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व ०५ (पाच) वर्षापैकी ०२ ( दोन ) वर्षे त्या जिल्हयाचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे.

२.खेळाडूंची मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत राज्य / राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमधील पुरस्कार वर्षांच्या लगतपूर्व ०५ (पाच ) वर्षातील राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वरिष्ठ / कनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा, शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल व यापैकी उत्कृष्ट ठरणाज्या ०३ (तीन) वर्षाच्या कामगिरीचा विचार गुणांकण कोष्ठकामध्ये करण्यात येईल.

३ .खेळाडूने स्पर्धांच्या मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सोबत सादर करणे आवश्यक राहील.

४.खेळाडूंचा अर्ज अधिकृत जिल्हा संघटने मार्फत सिफारस करून सादर करून आवश्यक राहील तथापि अपवादात्मक परिस्थीतीत खेळाडू वैयक्तीकरित्या अर्ज सादर करू शकतील.

५.एशियन गेम्स्, कॉमनवेल्थ गेम्स्, जागतीक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा (सर्व गट), जागतीक चषक क्रीडा स्पर्धा ( सर्व गट ), आशियाई अजिंक्यपद स्पर्धा ( सर्व गट), राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा ( सर्व गट ), युथ ऑलिंपीक गेम्स्, युथ कॉमनवेल्थ गेम्स्, युथ जागतिक आजिंक्यपद / युथ जागतिक चषक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत सहभागी खेळाडूस २०१९-२० करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार थेट देण्यात येईल.

क्रीडा संघटक / कार्यकर्त्याने सतत १० (दहा) वर्षे महाराष्ट्रात क्रीडा विकासासाठी भरीव योगदान दिलेले असावे व त्याने वयाची ३० वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. विहित नमुण्यातील अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आला आहे. बीड जिल्हयातील पात्र असलेल्या क्रीडापटुंनी उपरोक्त पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज दि. १० जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, मो.९६०४९५९६७८ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

## लिंबागणेश येथे गतिरोधकासाठी ठिय्या आंदोलन; तहसीलदार शेळकेंच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या भालचंद्र माध्यमिक विद्यालयासमोर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर व ग्रामस्थांनी आक्रमक होत भालचंद्र विद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले. याच राज्य मार्गावर येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून एचपीएम कंपनीने गतिरोधक बसवलेले असताना मांजरसुंभा ते चुंभळीफाटा मार्गाचे कंत्राटदार असणारी एचसीपीएल कंपनीने त्याच धर्तीवर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला. तहसीलदार चंद्रकांत शेळके, अशोक ससाणे उप अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या जिल्हा प्रशासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असुन लवकरात लवकर गतिरोधक बसविण्यात येतील या आश्वासनानंतर ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी अशोक डरपे, एचसीपीएल कंपनीचे प्रतिनिधी दादा बांगर, नेकनुर पोलिस स्टेशनचे ढाकणे , लिंबागणेश पोलिस चौकीचे पोहे. बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंडे, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे, सहशिक्षक मूकुंद मोटे, गणेश आजबे, आदी उपस्थित होते.

## सोमवारी ६ जानेवारी रोजी भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११. ०० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी, कर्मचा-याविरुध्द भ्रष्टाचारासंबधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीश: उपस्थित राहून लेखी स्वरुपात मांडाव्यात सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निवारण समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**नेकनूर । प्रतिनिधी**



माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभाग यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. ढास डी. के. तसेच डॉ. ज्योती मगर, डॉ. राजेश आरदवाड व डॉ. अंकुश काळे यांची उपस्थिती होती.सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. ढास डी. के. म्हणाले की, एक भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री असणाऱ्या सावित्रीबाई फुलेंना भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते. सावित्रीबाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. सावित्रीबाई आणि त्यांचे पती हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. या दोघांनी १ जानेवारी, १८४८ रोजी पुणे येथील भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली. ही शाळा देशात स्थापन झालेल्या सुरुवातीच्या शाळांपैकी एक होती. सावित्रीबाईंचा जन्म बालिका दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. डॉ. ज्योती मगर म्हणाल्या की, सावित्रीबाईनी आपले पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे महिलांना 'सावित्रीच्या लेकी' असेही संबोधले जाते.

## ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव ; किटकनाशक फवारणीचा आर्थिक भुर्दंड ;लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकरी हवालदिल

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश पंचक्रोशीतील ४-५ दिवसांपासून असलेल्या ढगाळ वातावरणामुळे तसेच काही ठिकाणी हलक्या सरी पडल्या असुन काही ठिकाणी पावसाचा शिडकाव झाला आहे त्यामुळे हरभरा पिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव झाला असुन या रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी किटकनाशकांची फवारणी करावी लागत असल्याने महागड्या औषधांचा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असुन शेतकरी हवालदिल झाला आहे.

गेल्या ३-४ दिवसात ढगाळ वातावरण सकाळी धुकं पडत आहे. सध्या हरभ-याला फुले आणि घाट्या लागलेल्या आहेत. घाट्यात अळ्यांचा प्रादुर्भाव झाला आहे.त्यामुळे आता किटकनाशक औषध फवारणीचा खर्च वाढला असल्याचे मुळुकवाडी येथील शेतकरी सुरज बारीकराव ढास यांनी सांगितले.

## थोडक्यात

### श्री नारायण विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बालिका दिन म्हणून सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन केले . प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर , प्रा. मस्के जी.बी, प्राध्यापिका भुतावळे मॅडम , श्री इनकर सर, श्री शेख सर होते. विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून आले होते. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे केली. यावेळी अनुष्का काशीद, मिताली चौरे,श्रेया सोलनकर श्रुती निर्मळ यांची भाषणे झाली. कार्यक्रमाला मार्गदर्शनपर भाषणे श्री इनकर बी .जे, श्री पौळ डी.बी ,सौ. भुतावळे बि. आर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन भाषणे केली. प्राध्यापिका भुतावळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना बक्षिसे वाटप केली. कार्यक्रमाला श्री रकटे एन. पी , प्रा. मुरमुडे सर, श्री पवार सर उपस्थित होते.

### के.एस.पी. विद्यालय येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

दि.०३/०१/२०२४ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या मुलांनी आपले मनोगत खुप गोड शब्दात सादर केले. काही मुलांनी सावित्रीबाई फुले यांच्या वर गीत रचना करुन गीत गायन केले. नाटीका सादर करण्यात आल्या. मुलींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभुषा करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून शाळेतील शिक्षक श्री रविंद्र जोगदंड सर, प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती कापरे मॅडम लाभले. अध्यक्ष भाषण करताना त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी बोलतांना सांगितले की, ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. १० मार्च १९९८ रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले.

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक,पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता.जि.बीड पिन - ४३११२२**

**जावक क्र. ११ दिनांक ०२/१/२०२५, तक्रार क्रमांक : ४१८/२०२४**

अर्जदार :- १. शैला प्रकाशराव पांगरीकर. २. प्रकाश मनोहरराव

**विरूध्द**

गैरअर्जदार :- १. श्री.साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड, मुख्य कार्यालय परभणे इस्टेट कोतवाल गल्ली, सुभाष रोड, बीड, ता.जि.बीड-४३११२२ २. साधना साहीनाथ परभणे, अध्यध्य, चेअरमन श्री.साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड, मुख्य कार्यालय परभणे इस्टेट कोतवाल गल्ली, सुभाष रोड, बीड, ता.जि.बीड- ४३११२२ ३. शाहीनाथ विक्रमराव परभणे, सचिव, श्री.साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड, मुख्य कार्यालय परभणे इस्टेट कोतवाल गल्ली, सुभाष रोड, बीड, ता.जि.बीड- ४३११२२ ४. शाखा व्यवस्थापक, श्री.साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड, शाखा-शाहुनगर बीड, ता.जि.बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांच्या विरूध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरूध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीसव्दारे आपणास कळविण्यात येते की, विरूध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०५/०२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकील किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरूध्द पक्षांनी याकामी कसून केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक : ०२/०१/२०२५
ठिकाण : बीड

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक,पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता.जि.बीड पिन - ४३११२२**

**जावक क्र. १२ दिनांक ०२/१/२०२५, तक्रार क्रमांक : ४१७/२०२४**

अर्जदार :- १. सुनंदा अरूण केदार २. अरूण केदार

विरूध्द

गैरअर्जदार :- २. सुरेश ज्ञानोबाराव कुटे, अध्यक्ष, चेअरमन ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप.

क्रेडीट सोसायटी लि.बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि.बीड-४३११२२ रा.चमडा फॅक्टरी एक आय डी सी बीड ता.जि.बीड. ३. यशवंत वसंतराव कुलकर्णी, व्हाईस, चेअरमन, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड. मुख्य शाखा बीड, ज्ञानराधा भवन, होंडा शोरूमच्या मागे, जालना रोड, बीड, ता.जि.बीड ४. शाखा व्यवस्थापक, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, शाखा : सारडा, बीड, ता.जि.बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांच्या विरूध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरूध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीसव्दारे आपणास कळविण्यात येते की, विरूध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०५/०२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकील किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरूध्द पक्षांनी याकामी कसून केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक : ०२/०१/२०२५
ठिकाण : बीड

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक,पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता.जि.बीड पिन - ४३११२२**

**जावकक्र.१३दिनांक०२/१/२०२५,तक्रारक्रमांक:३२६/२०२३**

अर्जदार :- १.रत्नमाला सखाराम कळासे २. सखाराम आश्रुबा कळासे

विरूध्द

गैरअर्जदार :- २. अँशिनी सुनिल वांढरे, मुख्यप्रबंधक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टे को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, राजीव गांधी चौक, ता.जि.बीड. रा. विप्रनगर, ब्राम्हणवाडी, बीड ता.जि.बीड रा. राजीव गांधी चौक, ता.बीड. जि.बीड. ५. बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टे को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, राजीव गांधी चौक, ता.बीड जि. बीड रा. राजीव गांधी चौक, ता.जि.बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांच्या विरूध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरूध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीसव्दारे आपणास कळविण्यात येते की, विरूध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकील किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरूध्द पक्षांनी याकामी कसून केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक : ०२/०१/२०२५
ठिकाण : बीड

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक,पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता.जि.बीड पिन - ४३११२२**

**जावक क्र. १४ दिनांक ०२/१/२०२५, तक्रार क्रमांक : ३२७/२०२३**

अर्जदार :- १.सुनंदा भाऊसाहेब परसे २. भाऊसाहेब पांडूरंग परसे

विरूध्द

गैरअर्जदार :- २. अँशिनी सुनिल वांढरे, मुख्यप्रबंधक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टे को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, राजीव गांधी चौक, ता.जि.बीड. रा. विप्रनगर, ब्राम्हणवाडी, बीड ता.जि.बीड रा. राजीव गांधी चौक, ता.बीड. जि.बीड. ५. बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टे को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.बीड, राजीव गांधी चौक, ता.बीड जि. बीड रा. राजीव गांधी चौक, ता.जि.बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांच्या विरूध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरूध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीसव्दारे आपणास कळविण्यात येते की, विरूध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकील किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरूध्द पक्षांनी याकामी कसून केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक : ०२/०१/२०२५
ठिकाण : बीड

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड**

शिक्का

## थोडक्यात

### सोमवारी लोकशाही दिन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आला आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

### साठेवाडी येथे श्रीमद् महावाक्य निर्वचन ज्ञानयज्ञ सोहळा



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील साठेवाडी येथे श्रीमद् महावाक्य निर्वचन ज्ञानयज्ञ सोहळा १ जानेवारीपासून सुरु झाला आहे. ३५ दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात कविश्वर कुलभुषण आचार्यप्रवर विद्वतरत्न श्री दुतोंण्डे बाबाजी (कुरुंदा) यांच्या अमृत वाणीतून पोथी वाचण सुरु झाले असून प्रवचन, सत्संग आदी धार्मिक कार्यक्रम देखील पार पडत आहेत. दरम्यान या सोहळ्यासाठी देशभरातून आचार्यगण, संत-महंत तसेच तपस्विनी यांच्यासह दोन हजार सदभक्तांची उपस्थिती आहे. त्यामुळे याठिकाणी भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. श्री आत्म तिर्थ प्रभू व परब्रम्ह परमेश्वर अवतार सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या कृपाप्रसादाने तसेच आचार्यगण, संत-महंत तथा तपस्विनी यांच्या शुभचिंतनाने श्रीमद् महावाक्य निर्वचन ज्ञानयज्ञ सोहळा हा गेवराई तालुक्यातील साठेवाडी याठिकाणी सुरु झाला आहे.

### शांताई अर्बन मध्ये ज्ञानज्योती सावित्री बाई फुले ची जयंती साजरी




**बीड । प्रतिनिधी**

भारतातील पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका,स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी, व समस्त स्त्रियांना शिक्षणाची वाट दाखवणाऱ्या, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी ड सारिका जोशी मॅडम आणि समाजसेविका सानप मॅडम यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली चूल आणि मूल ही प्रथा संपुवन आज ची स्त्री सक्षम बनण्यात फार मोलाचा वाटा सावित्री बाई फुले चां आहे असे मत शांताई अर्बन चे अध्यक्ष डॉ.डी बी शिंदे सर यांनी व्यक्त केले. शांताई अर्बन कडून स्त्री शक्तीचां सन्मान केला जातो असे मत सानप मॅडम यांनी मांडले ॲड जोशी मॅडम बोलताना असे म्हणाले मी शांताई अर्बन कडून महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न केले जातात ही अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे शांताई अर्बन च्या पुढील कार्यास त्यानी शूभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थे च्या सचिव शुभांगी शिंदे मॅडम यांनी ॲड जोशी मॅडम व सानप मॅडम यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार केला सर्व कर्मचारी पिगमि एजंट खातेदार व हितचिंतक यांनी ही सावित्री बाई फुले ना विनम्र अभिवादन केले.

# पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील गेवराई नगर पालिकेच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना निलंबित करा

## पाणी पुरवठा विभागाचे दुर्लक्ष; नागरिकांचा आरोप

**गेवराई । प्रतिनिधी**

पाणी बचतीसाठी पाणीकपातीचे धोरण राबविले जात आहे मात्र अनेक महिन्यांपासून पाणीपुरवठा करणारे कर्मचारी आपल्या सोयीनुसार पहाटे पाच वाजता किंवा मिळेल त्या वेळेत पाणी सुटतात त्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यासाठी कुठलेही वेळापत्रकाचे जाहीर नसल्यामुळे हे नियोजन कोलमडले आहे वेळापत्रक असल्यावर नागरिकांना पाणी येणार असल्याची सूचना देखील मिळते मात्र तसे न होता केव्हाही पाणी सोडायचे आणि मनमानी कारभार करायचाय या कारभारामुळे नागरिकांना पिण्यासाठी वेळेस पाणी मिळत नाही आपला उद्धार निर्वाह भागवण्यासाठी प्रत्येक जण आपल्या कर्तव्यास एकनिष्ठ असतो आणि हे कार्य पार करण्यासाठी किंवा पोट भरण्यासाठी माणूस रोज कामाला जातो परंतु अचानक घरी पाणी आल्यामुळे नेमकं भरायचं कसं असा प्रश्न उपस्थित होत आहे त्यामुळे याचा सर्वाधिक फटका लोकांना बसत आहे याकडे पाणी पुरवठा विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून उमटत आहे.

कुठलेही नियोजन न करता अचानक पाणी सोडल्याने हजारो लिटर पाणी गेवराई शहरात वाया जात असल्याचे दिसून येत आहे. याकडे प्रशासन लक्ष कधी देणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.काही भागांमध्ये दोन दिवसांतून एकदा पाणी येत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी दाही दिशा भटकावे लागत असताना दुसरीकडे मात्र लाखो लिटर पाणी वाया जात आहे. काही नागरिकांकडून विजेच्या मोटारीद्वारे पाणी घेण्याचाही प्रकार घडत आहे तसेच पाणी वितरणाचे ढिसाळ नियोजन यामुळे शहरात मागील काही दिवसांपासून पाणीटंचाई निर्माण झाली आहे. हा प्रश्न अधिक गंभीर आहे. नगरपरिषद प्रशासन मात्र सर्व काही आलबेल असल्याचे सोंग आणत आहे. नगरपरिषदेवर प्रशासक असल्यामुळे पाणीप्रश्नाबाबत गंभीर नसल्याने नागरिक हवालदिल झाले आहेत. नगरपरिषदेचा पाणीपुरवठा विभाग मनमानी पध्दतीने पाणी वितरण करत असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणत गैरसोय होत आहे. ठरावीक भागात जास्त वेळ, तर काही भागात जाणीवपूर्वक कमी प्रमाणात पाणी सोडणे, नागरिकांना पूर्वकल्पना न देता पाणी सोडण्याच्या वेळा बदलणे, नागरिकांशी हुज्जत घालणे असा मनमानी कारभार सध्या पाणीपुरवठा विभागाकडून सुरू आहे. त्याकडे दुर्लक्ष करत आहेत.

## 'जिव्हाळा ' सावित्रीमाईच्या विचारांचे घर : डॉ.राजीव काळे

**बीड । प्रतिनिधी**




बीड शहरात जिव्हाळा दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत शहरी बेघर निवारा केंद्र येथे ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. जिव्हाळा हे सावित्रीमाईच्या विचारांचे घर असल्याचे प्रतिपादन सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ. राजीव काळे यांनी केले. शिवसेनेचे युवा पदाधिकारी नितीनभैया धांडे यांच्या पुढाकारातून सातत्याने जिव्हाळा येथे वेगवेगळे उपक्रम राबवुन येथील बेघर , निराधारांना आधार देण्याचे काम होत आहे. ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीच्या औचित्यावर नितीन धांडे यांनी जिव्हाळा येथे भोजनाची मदत केली.त्याठिकाणी सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रमुख पाहुणे म्हणून अलकाताई कल्याण आखाडे, सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ. राजीव काळे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सीमा बनसोडे, विस्तार अधिकारी तुकाराम जाधव,राजाभाऊ गवळी, चंद्रसेन मनेरी,बाबुराव राऊत,शेख निजाम,राजु महुवाले, रमेश मदने, बाळासाहेब काकडे,शेटे सर आदिजण उपस्थित होते.यावेळी बोलतांना डॉ राजीव काळे म्हणाले की, सावित्रीमाई फुले यांचा विचार फक्त बोलण्यासाठी नाही.

## लोकमान्य टिळक महाविद्यालयात वाचन कौशल्य वर्गाचे आयोजन

**वडवणी । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वाचन कौशल्य वर्गाचे आयोजन दि.१ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. पवार यांचे मार्गदर्शन लाभले .

यावेळी कार्यक्रमाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. पवार म्हणाले की वाचन संस्कृती तळागाळापर्यंत रुजविण्यासाठी प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी दररोज वाचन केले पाहिजे. तसेच आपण काय वाचले त्याचे परीक्षण लिहून काढण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा कमीत कमी वापर करून जास्तीत जास्त पुस्तक वाचण्यास वेळ दिला पाहिजे. यावेळी आभार व्यक्त करताना महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. देविदास दडपे यांनी वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. उपप्राचार्य डॉ. बी. जी .कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी दररोज एक तास वाचन करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निर्भीड पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

### जिल्हा कार्याध्यक्षपदी सोळंके तर माजलगाव तालुका अध्यक्षपदी आडागळे यांची निवड



**माजलगाव । प्रतिनिधी**

निर्भीड पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठकीचे शासकीय विश्रामगृह बीड येथे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते जिल्हा व माजलगाव येथील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षपदी जिल्हाध्यक्ष देवेंद्र ढाका तर जिल्हासचिव आनंद वीर मार्गदर्शक समीर काझी व महिला जिल्हाध्यक्ष किरण डोळस यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये जिल्हा कार्याध्यक्षपदी परमेश्वर सोळंके व जिल्हा उपाध्यक्षपदी अमर साळवे यांची निवड करण्यात आली. तसेच माजलगाव तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब आडागळे उपाध्यक्षपदी शेख हमीद, सचिव राजरत्न डोंगरे सहसचिव सिद्धेश्वर गायकवाड, माजलगाव तालुका कार्याध्यक्षपदी संतोष रासवे तर मार्गदर्शक म्हणून प्रचंड सोळंके यांची निवड करण्यात आली. संघटक पदाची जबाबदारी विजय कापसे तर सहसंघटक पदी विजय डावरे यांची निवड करण्यात आली आहे.

## जागतिक बौद्ध धम्म परिषदेसाठी दयानंद स्वामी, श्रीराम खळगे, विजय साळवे रवाना

**माजलगाव । प्रतिनिधी**



भारतातीलच नव्हे तर जगातील बौद्धांचे पवित्र स्थान व जगातील बौद्ध जगतात एक आदर्श स्थान असलेल्या बौद्धगया येथे जागतिक स्तरावरील जागतिक बौद्ध धम्म परिषद दिनांक ५ जानेवारी २०२५ ते ८ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये संपन्न होत आहे बुद्धगया येथील बोधिवृक्षाखाली विश्ववंदनीय तथागत महाकारूनिक भगवान गौतम बुद्ध यांना ज्ञान प्राप्त झाले होते. त्यामुळे बौद्धगया येथे जगातील बौद्धांसाठी बौद्धगया विहार हे पवित्र स्थान म्हणून जगातील बौद्धांसाठी निर्माण झालेली आहे. ज्ञान प्राप्त झाल्याच्या नंतर तथागत भगवान बुद्धांनी त्या ज्ञानाच्या जोरावर अखंड मानव जातीलाच नव्हे तर पशुपक्षी प्राणी मात्रा वर सुद्धा दया करायला शिकविले व मानवाच्या दुःखमुक्तीचा मार्ग दाखविला. सम्राट अशोक यांनी निर्माण केलेल्या महाबोधी महाविहार या ठिकाणी जागतिक स्तरावरील जगातील बुद्धांची बौद्ध धम्म परिषद होत आहे.

## बीड तालुक्यातील लाडके भाऊ पगाराविना; ट्रेनी शिक्षकांचे मानधन आठवडाभरात द्या : धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**



तालुक्यातील ४२७ ट्रेनी शिक्षकांची पगार त्यांच्या निवडीच्या कालावधी पासून ते आजपर्यंत देत असलेल्या ४ महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण होऊनही झालेली नाही. याबद्दल पाठपुरावा करूनही ट्रेनी शिक्षकांना पगार होत नसल्याने जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन देत याबद्दल धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली मागणी करण्यात आली. यावेळी तालुक्यातील शेकडो ट्रेनी शिक्षक उपस्थित होते. दिनांक ३ जानेवारी रोजी तालुक्यातील लाडके भाऊ म्हणजेच ट्रेनी शिक्षकांनी धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित येत गटविकास अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी व कौशल्य विकास विभागला निवेदन देत थकलेल्या पगाराची मागणी केली. बीडचे गटशिक्षण अधिकारी खान यांच्या हलगर्जीपणामुळे फक्त बीड तालुक्यातील ट्रेनी शिक्षकांची पगार थकलेली असून याकडे सर्व वरिष्ठांनी लक्ष घालावे अशी विनंती यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# चिंचवन येथे मकरध्वज जन्मोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी

## राज्यातील नामवंत कीर्तनकार प्रवचनकार, गायनाचार्य, मृदंगाचार्य यांची लाभणार हजेरी

**वडवणी/संभाजी लांडे**

पवनपुत्र हनुमानाचे चिरंजीव असलेले मकरध्वज महाराज यांचे जगातील एकमेव मंदिर भारत देशात बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील चिंचवण येथे आहे. अहिरावण महिरावण राक्षसाने याच ठिकाणी राम लक्ष्मणाला लपवून ठेवले होते आणि याच ठिकाणावरून हनुमंताने मकरध्वजासोबत युद्ध करून त्यांची सोडवणूक करून घेतली होती. रामायण काळातील मंकावती नगरी असलेले आजचे वडवणी तालुक्यातील चिंचवन या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य दिव्य मकरध्वज जन्मोत्सव सोहळा येत्या पौष पौर्णिमेला साजरा होत आहे. या सोहळ्यानिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह होणार असून या सोहळ्यात राज्यातील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, गायनाचार्य, वादणाचार्यांची हजेरी लाभणार आहे. भाविकांसाठी हा एक सुंदर मेळावा असणार आहे. या सोहळ्याचा लाभ बीड जिल्ह्यातील भाविकांनी घ्यावा असे आवाहन चिंचवण गावकऱ्यांनी केले आहे.

रामायण ग्रंथामध्ये राम, लक्ष्मणाला अहिरावण महिरावण नावाचे राक्षस भुयारामध्ये घेऊन जातात. राम लक्ष्मणाचा शोध घेण्यासाठी हनुमान त्या भुयारात शिरतात. भुयाराच्या प्रवेशद्वारावर हनुमंत आणि त्यांचा मुलगा मकरध्वज यांचे घनघोर युद्ध होतं. युद्धामध्ये चर्चा केल्यानंतर पिता-पुत्र असल्याचा परिचय होतो. त्यानंतर हनुमान अहिरावण महिरावणाचा वध करतात आणि राम लक्ष्मणाची सोडवणूक करतात. रामायण काळातील ती मंकावती नगरी म्हणजे आजचे बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील चिंचवन नगरी होय. याच ठिकाणी देवी मंकावतीचे मंदिर आहे. आणि जगातील एकमेव मकरध्वजाचे मंदिर देखील या चिंचवन नगरीत आहे. संत भगवान बाबांनी या ठिकाणी धार्मिक उत्सव सुरू केला. भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह आणि मकरध्वज जन्मोत्सव सोहळा तेव्हापासून



सुरू आहे .आज या सोहळ्याला ६४ वर्ष पूर्ण होत आहेत. संत भगवान बाबा नंतर भीमसेन बाबा यांनी देखील या सोहळ्यामध्ये हजेरी लावली गावकरी मोठ्या आनंदान हा सोहळा साजरा करतात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ६ जानेवारी ते १३ जानेवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. सहा जानेवारी रोजी श्री क्षेत्र चाकरवाडी येथील तपोनिधी महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात होणार आहे .या सोहळ्यात गाथा भजन नेतृत्व पुरुषोत्तम महाराज कोठुळे तर ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व जीवन महाराज तांबडे हे करणार आहेत. या सोहळ्यात राज्यातील नामवंत कीर्तनकाराची कीर्तने प्रवचने गायन वादन होणार आहे. या सोहळ्यासाठी सर्व गावकरी आपापले कामे सोडून सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

### या महाराजांचे होणार कीर्तने

**मकरध्वज जन्मोत्सव सोहळ्यात दिनांक ६ जानेवारी ते १२ जानेवारी दरम्यान रात्री आठ ते दहा या वेळेत ६ रोजी जेऊर येथील ह. भ. प. अक्षय महाराज उगले, ७ रोजी तुकोबाराय पावन धाम संस्था संभाजीनगर येथील ह. भ. प. महादेव महाराज बोराडे शास्त्री ८ रोजी परळी येथील हभप भरत महाराज जोगी ९ रोजी परळी येथील हभप तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, १० रोजी टाकळी येथील ह भ प केशवराव महाराज घुले शास्त्री, ११ रोजी नाशिक येथील हभप अनिल महाराज तुपे, १२ रोजी सिद्धेश्वर महाराज संस्थान शिरूर कासार येथील ह भ प विवेकानंद महाराज शास्त्री तसेच १३ जानेवारी रोजी पौष्य पौर्णिमेनिमित्त या सप्ताहाचे काल्याचे किर्तन सकाळी अकरा वाजता महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड यांचे होईल. दिनांक १४ जानेवारी रोजी संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त सकाळी ११:०० ते १:०० या वेळेत राज्यातील नामवंत कीर्तनकार पुरुषोत्तम महाराज कोठुळे यांचे कीर्तन व त्यानंतर नंदकिशोर बाबासाहेब बडे पाटील व श्रीमंत संतराम बडे, पुरुषोत्तम भागवत तांबडे यांच्यातर्फे महाप्रसाद होणार आहे.**

